

# अरविंद परांजपे

तारांगण हे सर्वसामान्यांना विज्ञानाशी जोडणारे सर्वात प्रभावी केंद्र मानले जाते. वरळीचे नेहरू तारांगणही त्याला अपवाद नाही. या तारांगणाच्या सहाव्या संचालकपदी पुण्याच्या अरविंद परांजपे यांची नुकतीच निवड झाली आहे. आंतरविद्यापीठ खगोलशास्त्र आणि खगोल-भौतिकी केंद्राचे (आयुका) विज्ञानप्रसार अधिकारी असणारे परांजपे खगोलशास्त्राच्या प्रसारासाठीच ओळखले जातात. विज्ञानाला प्रयोगशाळेच्या चार भिंतींमधून मुक्त करून सर्वसामान्यांपर्यंत नेण्याची संकल्पना आयुकाचे संस्थापक आणि ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी आयुकाच्या स्थापनेच्यावेळीच मांडली. त्याला अनुसरून संस्थेचा स्वतंत्र विज्ञानप्रसार विभागही सुरू केला. १९९१मध्ये या विभागाचे संचालन करण्याची जबाबदारी परांजपे यांच्याकडे आली. तेव्हापासून सलग २० वर्षे त्यांनी ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न केले. राज्याच्या कानाकोपऱ्यातून आयुकाला भेट देणाऱ्या विद्यार्थी, शिक्षकांसाठी आयुका म्हणजे अरविंद परांजपे असेच समीकरण झाले. याला कारणही त्यांची सर्वांना समजेल अशा भाषेत खगोलशास्त्राची माहिती देण्याची शैली आणि  नवनव्या उपक्रमांद्वारे विस्तारत ठेवलेला आवाका. कमी खर्चात दुर्बिणी, स्पेक्ट्रोस्कोप, तसेच वैज्ञानिक उपकरणे बनवण्याच्या त्यांच्या कार्यशाळा देशभर गाजल्या. त्यांसाठी आजही अनेक राज्यांत त्यांचा प्रवास सुरूच असतो. सुरुवातीला बेंगळूरुच्या 'इंडियन इन्स्टिटय़ूट ऑफ अ‍ॅस्ट्रोफिजिक्स'च्या कावलूर येथील वेधशाळेतून आणि नंतर हिमालयात लेह येथे अतिउंचावर असणाऱ्या इन्फ्रारेड वेधशाळेतून त्यांनी निरीक्षणांचा अनुभव घेतला. भारतीय निरीक्षकांनी १९८८मध्ये शोधलेल्या '४१३० रामानुजन' आणि '१७७४४६ मोपाकू' या लघुग्रहांच्या शोधामध्ये त्यांचा सहभाग होता. १९९८मध्ये दिसलेल्या सिंह राशीच्या उल्कावर्षावाच्या शास्त्रीय निरीक्षणांसाठी त्यांनी पुढाकार घेऊन प्रथमच देशभरातील अनेक संस्थांना प्रशिक्षण दिले. लघुग्रहांच्या पिधानाची निरीक्षणेही त्यांनी देशात सर्वप्रथम घडवून आणली, त्याच्या माध्यमातून हौशी आकाशनिरीक्षकांचेही शोधनिबंध प्रसिद्ध झाले. आयुकाच्या गिरवली येथील वेधशाळेच्या परिसरातील ग्रामीण भागात विज्ञानप्रसाराची सुरुवात परांजपे यांच्या पुढाकाराने करण्यात आली आहे. ग्रामीण भागांतील विद्यार्थी आणि शिक्षकांना समजेल अशा सोप्या भाषेतील साहित्य आणि उपकरणांची निर्मितीही त्यांनी त्यासाठी केली आहे. विद्यार्थी, पालकांनी तारांगणाला नियमितपणे भेट द्यावी अशा नावीन्यपूर्ण कार्यक्रमांची निर्मिती करण्याची मनीषा परांजपे बोलून दाखवतात.